कि.फौ.अ.क्र. ३३/२०२२
निशाणी क्र. ३२ च्या पुढे

**<u>अ. सा. क्र. ३ चा उलटतपास जाबदेणार तर्फे वकील श्री. एम. टी. शितोळे यांचे मार्फत शपथेवर सुरु</u>**

६. माझे शिक्षण डिप्लोमा मेकॅनिकल झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाचा खर्च जाबदेणार यांच्या आईवडीलांनी केला. साक्षीदार पुढे सांगतो की, लग्नाचा खर्च अर्जदार यांच्या आईवडीलांनी केला. हे म्हणणे खरे आहे की, मी साक्षीसाठी माझ्या बहिणीसोबत आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, काय साक्ष दयायची हे मला माझ्या बहिणीने सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासाचे प्रतिज्ञापत्र बहिणीने आणि वकीलांनी मिळून तयार केले आहे.

७. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिस जाबदेणार यांचेकडून छळ झाला, मारहाण झाली हे मला माझ्या बहिणीने सांगितले मला वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्या वेळेस शिवीगाळ आणि मारहाण झाली त्यावेळेस मी तेथे नव्हतो. मला घटनेची तारीख सांगता येणार नाही. पोलीस ठाणेत कोणत्या तारखेला तक्रार दिली हे मला सांगता येणार नाही. पोलीसांनी त्यावेळेस माझा जबाब नोंदविला नाही.

८. वालचंदनगर ते कळंब हे अंतर एक किती इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, वालचंदनगर येथे कंपनी, शाळा, कॉलेज, मार्केट इत्यादी आहे. हे म्हणणे खरे आहे की, पेडगाव हे खेडेगाव असून त्या ठिकाणी शाळा, कॉलेज, मार्केट, हॉस्पिटल इत्यादी सुविधा नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पेडगाव हे खेडेगाव असल्याने अर्जदार हिस त्या ठिकाणी करमत नव्हते.

९. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार क्र. १ यांनी मॅ. पि. नं. १४७/२०२१ बारामती येथे दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर अर्जामध्ये तडजोड होऊन अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांच्यामध्ये असे ठरले की, जाबदेणार क्र. १ यांच्या भावापासून/कुटूंबापासून वेगळे स्वतंत्र घरात राहायचे. हे म्हणणे खरे नाही की, त्याप्रमाणे जाबदेणार क्र. १ आणि त्यांच्या भावामध्ये वाटप होउन जाबदेणार क्र. १ यांना स्वतंत्र बंगला आणि पावणे तीन एकर क्षेत्र देण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, तडजोड झालेनंतर अर्जदार ही केवळ १० दिवस

सासरी नांदली. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, अर्जदार हिस उपाशी ठेवत होते. अर्जदार हिस उपाशी ठेवत असलेबाबत मी पोलीस ठाणेत तक्रार दिलेली नाही. आम्ही कोर्टामध्ये प्रस्तुत अर्ज दाखल करणार असलेने पोलीस ठाणेत तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिस पेडगाव येथे रहायचे नव्हते.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार क्र. १ यांच्या हातास बोटे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार क्र. १ यास बोटे नसल्यामुळे त्यास काही काम करता येत नाही, कोणतिही जड वस्तु उचलता येत नाही.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार यांच्या लग्नामध्ये माझे आईवडीलांनी दोन ते तीन लाख खर्च केला, दोन ते तीन तोळे सोने, वरदक्षिणा ५०,०००/— हे मी खोटे सांगत आहे. सोन्याच्या पावत्या दाखल करणेकरिता त्या आहेत किंवा कसे हे मला पहावे लागेल. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिस जाबदेणार क्र. १ यांचेसोबत नांदावयाचे नसल्याने आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2025.02.05 15:24:22 +0530

(जे. एन. भस्मे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

ठिकाण इंदापूर
दिनांक ०४/०२/२०२५